**नियमीत दिवाणी दावा क्र.२२/२०२५**
**निशाणी क्र.५३ वरील आदेश**
**पंचफुलाबाई जाधव व ईतर वि. अरविंद जाधव व ईतर**
( दिनांक १० जून, २०२६ )

वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश १४ नियम ५ प्रमाणे अतिरीक्त मुद्दा काढण्याबाबत अर्ज केला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, वादीने पुराव्याकरीता नेमलेले तारीख असल्यामुळे निशाणी क्र.५१ प्रमाणे मुद्दे काढलेले असताना त्याचे अवलोकन केले. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी ३८ च्या लेखी जबाबामध्ये नमुद केलेल्या रस्त्याबाबत मुद्दा काढण्यात आलेला नाही असे जाणवले. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन अतिरीक्त मुद्दा काढण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. याउलट प्रतिवादी क्र.१ व २ यांनी असे म्हणणे मांडलेले आहे की, नेमका कोणता मुद्दा काढणे आवश्यक आहे याचा स्पष्टपणे उल्लेख करण्यात आलेला नाही. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये कुठलाही लेखी जबाब दिलेला नाही. त्यामुळे कायदेशीररित्या कोणताही वाद मुद्दा स्थापीत होवू शकत नाही. त्यामुळे अर्ज खारीज करण्यात यावा.

४. अर्जातील कथनांचा विचार करता आदेशासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदरच्या मुद्दयांवरील माझे निष्कर्ष मी दिलेल्या कारणमीमांसेसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जात नमुद केल्याप्रमाणे दि.प्र.सं. आदेश १४ नियम ५ प्रमाणे अतिरीक्त मुद्दा काढणे आवश्यक आहे का ? | नकारार्थी. |
| २) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीता:</u>**

५. प्रकरणाची पडताळणी केली असता असे दिसून येते की, प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये पुराव्याकरीता तारीख नेमलेली असताना वादीला असे निदर्शनास आले की, निशाणी ५१ खाली काढण्यात आलेल्या मुद्दयांमध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.३८ प्रमाणे लेखी उत्तर दिलेले आहे व त्या अनुषंगाने कुठलाही मुद्दा काढण्यात आलेला नाही. वरील अर्जाला प्रतिवादी क्र.१ व २ यांनी विरोध दर्शविलेला आहे. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून तसेच प्रस्तुत प्रकरणातील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीने प्रस्तुतचा दावा उद्घोषणा व निरंतर मनाई हुकूमासाठी केलेला आहे. वादीने अशी उद्घोषणा मागितली आहे की एस.डी.ओ. मंगरुळपीर यांनी दि.२७.०२.२०२५ आणि तहसिलदार मंगरुळपीर यांनी दि.२३.०१.२०२४ रोजी दिलेला आदेश हा रद्दबातल करण्यात यावा. तसेच वादीने कुठलाही नवीन रस्ता दावा मिळकतीतून काढण्यात येवू नये असा निरंतर मनाई हुकूमाचा आदेश करावा याकरीता दावा दाखल केला आहे. दावा दाखल झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी निशाणी ३८ वर आपला लेखी जबाब संयुक्तरीत्या दिलेला आहे. या लेखी जबाबामध्ये परिच्छेद क्र.१५ मध्ये मा. एस.डी.ओ. व तहसिलदार यांनी केलेल्या आदेशाबाबत देण्यात आलेल्या प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी मा. तहसिलदार तसेच मा. एस.डी.ओ. यांनी पारीत केलेले आदेश हे रद्दबातल करण्यात यावे याबाबत विनंती केलेली आहे. या आदेशामध्येच वादीने उद्घोषणा मागितलेली असल्यामुळे प्रतिवादीने आपल्या लेखी जबाबमध्ये मांडलेला मुद्दा देखील या आदेशामध्ये अंतर्भूत आहे. तसेच प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी आपला लेखी जबाब न दिल्यामुळे त्यांच्याविरुद्ध निशाणी १ वर दि.२३.०७.२०२५ रोजी प्रकरण बिना लेखी जबाब चालवण्याचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी मांडलेल्या मुद्यांबाबत प्रतिवादी क्र.१ व २ यांनी आपल्या लेखी जबाबामध्ये तहसिलदार यांनी केलेल्या आदेशाचा ऊहापोह केलेला आहे. वादी तोच आदेश रद्दबातल करण्याकरीता प्रस्तुत दावा दाखल केला आहे.

६. दूसरी महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादी यांनी निशाणी ३८ वर

दिलेल्या जबाबाला वादीने कुठलेही उत्तर किंवा आपला जबाब दिलेला नाही. माझ्या पुर्वीच्या न्यायाधीश महोदयांनी वादी तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या लेखी जबाबाच्या अनुषंगाने दि.१७.११.२०२५ रोजी निशाणी ५१ वर मुद्दे काढलेले आहेत. सदरच्या मुद्दयांमध्ये मा. तहसिलदार तसेच एस.डी.ओ. यांनी केलेले आदेश व त्याबाबत वादीने मागितलेल्या उद्घोषणेबाबत तसेच निरंतर मनाई हुकूमाच्या आदेशाबाबत एकूण ४ मुद्दे काढलेले आहेत. सदरचे मुद्दे हे वादी व प्रतिवदी क्र.१ व २ यांनी एकमेकांविरोधी केलेल्या कथनांच्या अनुषंगाने काढलेले आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ यांनी आपला लेखी जबाब दाखल केलेला नाही. त्यामुळे त्यांनी केलेले कथने हे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी जशीच्या तशी आपल्या लेखी जबाब निशाणी ३८ मध्ये फक्त नमुद केलेले आहे. या सर्व गोष्टींचा ऊहापोह हा माझ्या पुर्वीच्या न्यायाधीश महादेयांनी काढलेल्या मुद्दा क्र. २ यामध्ये अंतर्भूत आहे. त्यामुळे अतिरीक्त मुद्दा काढण्याबाबत मला आवश्यकता दिसून येत नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANKAJ PADMAKAR NAIGAONKAR
Date: 2026.06.10 17:15:04 +0530

**मंगरुळपीर.** **( पी. पी. नायगावकर )**
**दिनांक — १०/०६/२०२६** **दिवाणी न्यायाधीश (व. स्तर), मंगरुळपीर**

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word to word, as per original judgment/order. | | |
| 1) | Name of Stenographer | :- S. V. Dere (Stenographer G-II) |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 10/06/2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 10/06/2026 |
| 5) | Order uploaded on | :- 10/06/2026 |